**<u>फिर्यादी तर्फे साक्षीदार क्र. १</u>**

**मी शपथपूर्वक खरे सांगतो की**

**<u>सं.फौ.ख.क्र.१०/२०२३</u>**
**प्रमोद विरुध्द अशफाक**
**निशाणी – १२**

**सरतपासणी शपथेवर सुरु द्वारे वकील श्री. टेकाम यांच्या मार्फत**

**४१.** मी सदर प्रकरणात माझे सरतपासाचे लेख दाखल केला असून त्यातील मजकूर माझे वकीलांनी माझे सांगण्याप्रमाणे लिहिलेला आहे. त्यातील मजकूर माझे माहितीप्रमाणे खरा व बरोबर असून त्यावर मी वाचून समजून सही केली आहे. तो **<u>निशाणी १२</u>** वर आहे.

**४२.** मला आता निशाणी २/अ कडील अनु क्र. १ चा कागद दि.२३.०६.२०२१ रोजीची विक्री रसीद दाखविण्यात आली. त्यावर माझी व आरोपीची सही आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास **<u>निशाणी २२</u>** देण्यात येते.

**४३.** मला आता निशाणी २/अ कडील अनु क्र. ३ चा कागद दाखविण्यात आला. सदरचा दस्त दि. २९.०८.२०२२ रोजी तयार करण्यात आला होता. त्यावर माझी व आरोपींच्या सहया आहे. तसेच साक्षीदार सुनील वाघमारे व प्रशांत रोडगे यांच्या सहया आहे, त्या सहया मी ओळखतो. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास **<u>निशाणी २३</u>** देण्यात येते.

**४४.** मला आता निशाणी २/अ कडील अनु क्र. ४ चा कागद दाखविण्यात आला. सदरची तक्रार मी पोलिस स्टेशन कपील नगर नागपूर यांच्याकडे दि.२६.०८.२०२२ रोजी दिली होती. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे.

**४५.** मला आता निशाणी २/अ कडील अनु क्र. ५ कडील धनादेश दाखविण्यात आला. त्यावर आरोपी अशफाक कुरेशीची सही आहे. ती मी ओळखतो. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास **<u>निशाणी २४</u>** देण्यात येते.

**४६.** मला आता निशाणी २/अ कडील अनु क्र. ६ चा कागद दाखविण्यात आला. सदरचा दस्त बँक ऑफ इंडिया कडील दि. २६.१०.२०२२ रोजीचा मुळ मेमो आहे. त्यावर बँकेच्या अधिका–याची सही व बँकेचा शिक्का आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास **<u>निशाणी २५</u>** देण्यात येते.

**फिर्यादीच्या वकीलांनी पुढील सरतपास घेण्यास मुदत मागितली सबब पुढील सरतपास पुढील तारखेपर्यंत तहकूब.**

श्रवणोत्तर स्वीकृत
समक्ष

MOHAN RAMCHANDRA KAMAT
Digitally signed by MOHAN RAMCHANDRA KAMAT
Date: 2025.08.21 11:02:39 +0530

कामठी
दिनांक २०/०८/२०२५

( मोहन रा. कामत )
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,
न्यायालय क्र.१, कामठी